## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर-१०६६/२०२२**

**अपिलार्थी, श्री.शेख मोहम्मद सलीम,**
**ए-१०४, मखदुम मियाँ अपार्टमेंट,**
**डोंगरे नगर, अश्रफी मस्जिद जवळ,**
**तन्वर नगर जवळ, कौसा, मुंब्रा,**
**जि.ठाणे ४०० ६१२.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
अब्दुल्लाह पटेल हायस्कूल, किस्मत कॉलनी,
नागसेन नगर, मुंब्रा, जि.ठाणे ४०० ६१२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी
(प्राथमिक)जिल्हा परिषद ठाणे, मिलेनियम टोयोटा
शो-रुम जवळ,२२ नं. सर्कल, वागळे इस्टेट,ठाणे (प),
जि.ठाणे ४०० ६०४.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ७.४.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ३.११.२०२१ | --- | ३.१.२०२२ | ---- |

अपिलार्थी यांनी दि.२.३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच नुकसान भरपाई देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ७.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. भिमा शेळके, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, प्राथमिक, जिल्हा परिषद ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(१. List of teaching and non-teaching staff. (Including aided and unaided teaching staff), २.List of seniority of teaching staff and their designation. (Including aided and unaided teaching staff) ३. Certified copy of staff approval for the academic year २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१.) "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांना आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

संगणक -10

